# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १४४ वा ❑ भारतीय सौर दिनांक २७ आषाढ शके १९४८, शनिवार दि.१८ जुलै २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## मुस्लिम पर्सनल लॉ पोक्सोपेक्षा श्रेष्ठ नाही

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार दिला आहे, परंतु जेव्हा धार्मिक रीतीरिवाज किंवा पर्सनल लॉ (वैयक्तिक कायदे) देशातील बालकांच्या मूलभूत हक्कांवर आणि त्यांच्या सुरक्षेवर गदा आणतात, तेव्हा देशाचा कायदा सर्वोच्च ठरतो. ७ जुलै २०२६ रोजी इलाहाबाद उच्च न्यायालयाने प्रयागराज येथील एका १६ वर्षांच्या मुस्लिम मुलीच्या बालविवाह प्रकरणात दिलेला निर्णय याच तत्त्वाला अधिक बळकट करतो. न्यायालयाने अत्यंत कडक शब्दांत स्पष्ट केले आहे की, ''बालविवाह प्रतिबंधक कायदा, २००६ आणि पोक्सो कायदा हे देशातील कोणत्याही वैयक्तिक कायद्यापेक्षा (मुस्लिम पर्सनल लॉसह) वरचढ आहेत आणि देशातील बालविवाह बंदी हा कायदा सर्व धर्मांना समान रीतीने लागू होतो.''

हे संपूर्ण प्रकरण एका १६ वर्षांच्या मुस्लिम मुलीचा विवाह रोखण्यासाठी गेलेल्या पोलीस आणि चाईल्ड लाईनच्या अधिकाऱ्यांच्या कारवाईशी संबंधित आहे. लग्न मंडपात पोहोचून अधिकाऱ्यांनी हा बालविवाह रोखला होता. या कारवाईला आव्हान देणारी एक याचिका उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. याचिकाकर्त्यांच्या वतीने युक्तिवाद करताना मुस्लिम पर्सनल लॉचा (शरियत) दाखला देण्यात आला, ज्यानुसार वयात आलेल्या (प्युबर्टी गाठलेल्या) अल्पवयीन मुलीचा विवाह वैध मानला जातो. मात्र, न्यायालयाने हा युक्तिवाद पूर्णपणे फेटाळून लावला आणि पोलीस प्रशासनाची कारवाई योग्य ठरवली.

पोक्सो आणि बालविवाह कायद्याची सर्वोच्चता

सुनावणीदरम्यान न्यायमूर्तींनी बाल हक्क आणि कायद्याच्या सर्वोच्चतेवर विशेष भर दिला. न्यायालयाच्या या निर्णयामुळे कायद्याच्या क्षेत्रातील दोन अत्यंत महत्त्वाचे पैलू पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहेत.

बालविवाह प्रतिबंधक कायदा, २००६: हा कायदा स्पष्ट करतो की, भारतातील मुलींच्या विवाहाचे कायदेशीर वय १८ वर्षे आणि मुलांचे २१ वर्षे आहे. हा कायदा सामाजिक सुधारणेसाठी आणला गेला असून तो धर्मनिरपेक्ष आहे, म्हणजेच तो कोणत्याही विशिष्ट धर्मापुरता मर्यादित नसून देशातील प्रत्येक नागरिकाला समान रीतीने लागू होतो.

पोक्सो कायदा : या कायद्यानुसार १८ वर्षांखालील कोणतीही व्यक्ती ही बालक मानली जाते. न्यायालयाने स्पष्ट केले की, कायद्याने ठरवून दिलेल्या वयापूर्वी विवाह करणे आणि अल्पवयीन मुलीसोबत शारीरिक संबंध ठेवणे हे कायद्याच्या चौकटीत कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाऊ शकत नाही. पोक्सो कायद्यानुसार अल्पवयीन संमतीला कायदेशीर मान्यता नाही, त्यामुळे विवाहाचा दाखला देऊन लैंगिक शोषणाचे समर्थन करता येणार नाही.

''बालकांचे हक्क आणि त्यांचे संरक्षण हे कोणत्याही धार्मिक रीतीरिवाजांपेक्षा किंवा वैयक्तिक कायद्यांपेक्षा सर्वोच्च आहेत. कायद्याने ठरवलेल्या वयाआधी विवाह लावणे आणि अल्पवयीन मुलीशी शारीरिक संबंध ठेवणे हा सरळ सरळ गुन्हा आहे.'' इलाहाबाद उच्च न्यायालय

याचा अर्थ असा की, जर देशात रहदारीचे नियम (उदा. लाल दिव्यावर थांबणे) असतील, तर ते सर्वांना पाळावे लागतात. कोणीही व्यक्ती असा दावा करू शकत नाही की, माझ्या धर्माचे नियम वेगळे आहेत, त्यामुळे मला हे नियम लागू होत नाहीत. तसेच मुलांच्या संरक्षणासाठी केलेले कायदे हे देशातील सर्वांसाठी समान आहेत.

या निर्णयाचे दूरगामी सामाजिक परिणाम

भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात अनेकदा धार्मिक कायदे आणि संविधानाने दिलेले सामाजिक कायदे यांच्यात संघर्ष पाहायला मिळतो. या पार्श्वभूमीवर हा निर्णय अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतो.

मुलींच्या आरोग्याचे आणि शिक्षणाचे रक्षण: अल्पवयीन वयात लग्न झाल्यामुळे मुलींचे शिक्षण अर्धवट सुटते आणि त्यांच्या आरोग्यावर (विशेषतः कमी वयातील मातृत्वामुळे) गंभीर परिणाम होतो. न्यायालयाचा हा निर्णय अशा मुलींना कायदेशीर सुरक्षितता देणारा आहे.

समानतेचा अधिकार: सर्व धर्मांतील मुलींना बालविवाहासारख्या प्रथेपासून आणि शोषणापासून समान संरक्षण मिळणे हा त्यांचा मानवाधिकार आहे, यावर न्यायालयाने शिक्कामोर्तब केले आहे.

कायदेशीर स्पष्टता: या निर्णयामुळे पुन्हा एकदा युनिफॉर्म सिव्हिल कोड (समान नागरी कायदा) आणि पर्सनल लॉमधील विसंगतींवर देशात चर्चा सुरू झाली आहे. बालहक्क कार्यकर्त्यांनी या निर्णयाचे स्वागत केले असून, यामुळे अल्पवयीन मुलींचे शोषण थांबवण्यास मोठी मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

इलाहाबाद उच्च न्यायालयाचा हा निर्णय केवळ एका विवाहापुरता मर्यादित नसून तो देशातील बालहक्क चळवळीला नवीन दिशा देणारा आहे.

प्रगतीशील समाजात बालकांचे शोषण थांबवणे ही काळाची गरज आहे. धार्मिक स्वातंत्र्याचा आदर केला पाहिजे, परंतु जेव्हा प्रश्न लहान मुलांच्या भविष्याचा, त्यांच्या आरोग्याचा आणि त्यांच्या शोषणाचा येतो, तेव्हा संसदेने बनवलेला कायदा हा सर्वांसाठी समान आणि सर्वोच्च असला पाहिजे, हे या निर्णयाने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.

# प्राचीन शास्त्रे किती खरी यावर वादसभेचे आयोजन संपन्न

## भारतीय ज्ञानसंपदा मौखिक आणि लिखित स्वरूपात समृद्ध – डॉ. नितीन करमळकर

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे : प्राचीन शास्त्रे किती खरी या विषयावर पुणे येथे वादसभेचे आयोजन करण्यात आले. प्रसाद प्रकाशन आणि विज्ञान भारती यांच्या संयुक्त विद्यमाने एस. एम. जोशी सभागृहात ही वादसभा पार पडली. या वादसभेत भारतीय ज्ञानसंपदेच्या विविध पैलूंवर चर्चा करण्यात आली.

यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी भारतीय ज्ञानसंपदा मौखिक आणि लिखित अशा दोन्ही स्वरूपांत समृद्ध असल्याचे मत व्यक्त केले. धातुशास्त्र, पर्जन्यशास्त्र, सेंद्रिय शेती, जलव्यवस्थापन आणि स्थापत्यशास्त्र यांसारख्या ज्ञानशाखा पूर्वजांनी विकसित करून पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवल्या. नवीन शैक्षणिक धोरणात भारतीय ज्ञानसंपदेला विशेष स्थान देण्यात आले असून, त्यासाठी स्वतंत्र घटक समाविष्ट करण्यात आला आहे, असेही त्यांनी नमूद केले.

डॉ. करमळकर वादसभेच्या न्यायाध्यक्षपदी होते. प्रसाद




प्रकाशनच्या संचालिका डॉ. उमा बोडस यावेळी उपस्थित होत्या. वादसभेत डॉ. माधवी गोडबोले, डॉ. मनीषा पुराणिक, डॉ. मनीष वाळवेकर, डॉ. अंबरीष खरे, रमेश दाते आणि डॉ. दीप्ती सिधये यांनी सहभाग घेतला.

भारतीय शास्त्रपरंपरा केवळ वैराग्य किंवा मोक्षापुरती मर्यादित नसून, ऐहिक आणि पारलौकिक अशा दोन्ही प्रकारच्या जीवनमूल्यांचा विचार करणारी आहे. रसशास्त्र आणि धातुशास्त्र यांसारख्या अनेक ज्ञानशाखांचे पुरावे आजही उपलब्ध आहेत. त्यांचे भौतिक अवशेष आणि ऐतिहासिक साक्षी प्राचीन भारतात या विषयांबाबत प्रगल्भ वैचारिक मांडणी आणि ज्ञानपरंपरा अस्तित्वात होती, हे दर्शवतात मात्र आधुनिक विज्ञानाच्या दृष्टीने केवळ वैचारिक मांडणी पुरेशी ठरत नाही. विज्ञान म्हणजे तर्काधिष्ठित गृहीतक आणि प्रयोगांद्वारे त्याची पडताळणी हे दोन्ही घटक आवश्यक असतात. भारतीय प्राचीन शास्त्रांमध्ये अनेक ठिकाणी वैचारिक मांडणी आढळते; परंतु त्या संकल्पनांची प्रयोगाधारित पडताळणी झाल्याचे पुरावे सर्वत्र उपलब्ध नाहीत. त्यामुळे त्या सर्व गोष्टींचा आधुनिक विज्ञानात जसाच्या तसा समावेश करता येत नाही, असेही चर्चेत समोर आले.

हजारो वर्षांपूर्वीची स्थापत्यकला, धातुकाम, जलव्यवस्थापन आणि इतर तांत्रिक उपलब्धी आजही भौतिक स्वरूपात दिसून येतात. यावरून त्या काळात विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे ज्ञान निश्चितच अस्तित्वात होते, हे स्पष्ट होते.

काही ग्रंथ आज उपलब्ध नसल्याने किंवा सर्व नोंदी सापडत नसल्याने त्या काळातील लोकांना हे ज्ञान नव्हते, असा निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही. हजारो वर्षांची परंपरा पाहता, या ज्ञानाची नोंद विविध स्वरूपात झालेली असण्याची शक्यता आहे.

आपण असे म्हणू शकत नाही की प्राचीन भारतात विज्ञानातील सर्वच ज्ञान उपलब्ध होते; तसेच काहीच नव्हते, असे म्हणणेही तितकेच चुकीचे आहे. काही क्षेत्रांत आपण निश्चितच अत्यंत प्रगत होतो आणि त्याचे पुरावे उपलब्ध आहेत. त्या उपलब्धींचा स्वीकार करतानाच, विज्ञानाच्या प्रत्येक क्षेत्रात आपण पूर्णतः प्रगल्भ होतो, असा दावा करणेही योग्य ठरणार नाही. अशा संतुलित आणि पुराव्यांवर आधारित दृष्टिकोनातून भारतीय ज्ञानपरंपरेकडे पाहण्याची गरज आहे. या बाबी वादसभेत मांडण्यात आल्या.

डॉ. उमा बोडस म्हणाल्या, एखादा विषय समजून घ्यायचा असेल, तर त्याच्या सर्व बाजू समजून घेणे आवश्यक असते. केवळ एखाद्या गोष्टीची माहिती असणे म्हणजे ज्ञान नव्हे. आपल्या भारतीय परंपरेत वाद म्हणजे भांडण नसून प्रश्न मांडणे, तर्क मांडणे आणि शंका उपस्थित करणे होय. अशा चिकित्सक संवादातून सत्य अधिक स्पष्ट होत जाते. त्यामुळे वादसभा ही मतभेद मिटविण्याचे आणि सत्याचा शोध घेण्याचे प्रभावी माध्यम आहे.

# आजच्या काळात एकत्र कुटुंब पद्धतीची गरज

**ज्योतिर्मय साहित्य**

भारतीय संस्कृतीची खरी ओळख म्हणजे ''एकत्र कुटुंब व्यवस्था''. अनेक पिढ्या एकाच छताखाली प्रेम, जिव्हाळा, संस्कार आणि परस्पर सहकार्याच्या भावनेने राहणे ही आपल्या समाजाची गौरवशाली परंपरा होती. काळाच्या ओघात औद्योगिकीकरण, शहरीकरण, नोकरी-व्यवसायाच्या बदलत्या संधी, आधुनिक जीवनशैली आणि व्यक्तिस्वातंत्र्याच्या वाढत्या अपेक्षा यामुळे विभक्त कुटुंब पद्धतीला चालना मिळाली. आज अनेक कुटुंबे लहान झाली आहेत; मात्र या बदलामुळे काही सुविधा मिळाल्या असल्या तरी समाजासमोर अनेक गंभीर प्रश्नही निर्माण झाले आहेत.

विभक्त कुटुंबामुळे स्वतंत्र निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य, आर्थिक नियोजनातील मोकळीक आणि गोपनीयता मिळते. पती-पत्नी आपल्या पद्धतीने संसार करू शकतात. नोकरी किंवा व्यवसायानिमित्त स्थलांतर करणेही तुलनेने सोपे होते. त्यामुळे आधुनिक जीवनशैलीशी जुळवून घेणे अनेकांना सोयीचे वाटते.

परंतु या पद्धतीचे दुष्परिणामही तितकेच गंभीर आहेत. वृद्ध आई-वडील अनेकदा एकटे पडतात. मुलांवर संस्कार करणारे आजी-आजोबा दूर राहिल्याने मुलांमध्ये कौटुंबिक मूल्ये, सहनशीलता आणि नात्यांचा आदर कमी



होत असल्याचे दिसून येते. लहान-सहान कारणांवरून पती-पत्नीमध्ये मतभेद वाढणे, मानसिक ताण, नैराश्य आणि घटस्फोटाचे वाढते प्रमाण हीदेखील चिंतेची बाब आहे.



डी. एन. चौधरी
विशाल लॉन्स अँड रिसॉर्ट, जामनेर


एकत्र कुटुंबात प्रत्येक सदस्य हा दुसऱ्याचा आधार असतो. संकटाच्या काळात आर्थिक, मानसिक आणि सामाजिक मदत सहज मिळते. घरातील जबाबदाऱ्या वाटून घेतल्या जातात. मुलांचे संगोपन, वृद्धांची सेवा आणि कौटुंबिक संस्कार यासाठी एकत्र कुटुंब व्यवस्था अत्यंत उपयुक्त ठरते. प्रेम, जिव्हाळा, त्याग, समन्वय आणि परस्पर आदर यांसारखी जीवनमूल्ये याच व्यवस्थेत अधिक प्रभावीपणे जोपासली जातात.

अर्थात, एकत्र कुटुंब व्यवस्थेत काही अडचणीही असतात. मतभेद, पिढ्यांतील विचारांचा संघर्ष, निर्णयप्रक्रियेत विलंब किंवा वैयक्तिक स्वातंत्र्यावर काही प्रमाणात मर्यादा येऊ शकतात. मात्र संवाद, समजूतदारपणा आणि परस्पर सन्मान यांच्या बळावर या अडचणी सहज दूर करता येतात.

आजच्या धकाधकीच्या आणि स्पर्धेच्या युगात माणसाला पैशापेक्षा माणसांची अधिक गरज आहे. आधुनिकतेचा स्वीकार करताना कुटुंबातील नाती, प्रेम, जिव्हाळा आणि संस्कार जपणे ही काळाची गरज आहे. एकाच घरात राहणे शक्य नसले तरी मनाने एकत्र राहणे, ज्येष्ठांचा सन्मान करणे आणि कौटुंबिक ऐक्य टिकवणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

एकत्र कुटुंब व्यवस्था ही केवळ राहण्याची पद्धत नसून ती भारतीय संस्कृतीचा आत्मा आहे. कुटुंब मजबूत असेल तर समाज मजबूत होईल आणि समाज मजबूत झाला तर राष्ट्र अधिक सक्षम बनेल. त्यामुळे आधुनिकतेबरोबरच कुटुंब व्यवस्थेतील प्रेम, एकोप्याची भावना आणि संस्कार जपणे हीच आजच्या काळाची खरी गरज आहे.


ज्योतिर्मय
साहित्याचे विद्यापीठ

Sanjay Vyapari

Scan to pay with any UPI app

## नवोदित साहित्यिकांसाठी सुवर्णसंधी

ज्योतिर्मय साहित्य महाराष्ट्रातील सर्व नवोदित लेखकांसाठी एक हक्काचे व्यासपीठ म्हणून पुढे येत आहे. फक्त साहित्यावर आधारित महाराष्ट्रातील एकमेव ई-दैनिक ज्योतिर्मय साहित्य हे आहे.

मागील दीड वर्षात या व्यासपीठावरून साधारण 150 + साहित्यिक तयार झाले आहेत आणि ही संख्या दररोज वाढत आहे.

नवोदित साहित्यिक या व्यासपीठावरून बिनधास्त लेखन करू शकतो कारण त्यांना योग्य मार्गदर्शन करणारी टीम येथे आहे. याचा अनुभव मागील वर्षात अनेक साहित्यिकांनी घेतला आहे. त्यांचे साहित्य या व्यासपीठावरून त्यांचा फोटो व मोबाईल क्रमांकासह देण्यात येते. त्यामुळे वाचक त्यांच्याशी थेट संपर्क करू शकतो.

ज्योतिर्मय च्या व्यासपीठावरून कोणीही आपले विचार मांडू शकतो, त्यांच्यासाठी अट फक्त एकच आहे. त्यांना रुपये पाचशे भरून वार्षिक सदस्यता घ्यावी लागते, नंतर ते वर्षात संपूर्ण 365 दिवस या व्यासपीठाचा वापर करू शकतात.

मित्रांनो मग वाट कसली बघता लगेच ज्योतिर्मय साहित्य चे मेंबर व्हा व लिहिण्यास सुरुवात करा, तुमचे उज्वल भवितव्य लवकरच येथे घडणार आहे.

@ संजय व्यापारी,
संपादक, ज्योतिर्मय साहित्य, पुणे
वार्षिक वर्गणी 7743918559 या नंबरवर किंवा दिलेल्या QR Code वर ऑनलाईन पाठवा. व पैसे भरल्याचा स्क्रिनशॉट पाठवा.



# जात्यावरच्या ओव्या......

एका मायचे लेकर
घेती फिरवून तोंड
फांद्या फुटल्या नव्या
मनी झुरतय खोड ||७४८||

एका मायचे लेकर
नही बोलत आपसात
बालपणीचे रुसवे
माय आठवे मनात ||७४९||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ५३

ज्योतिर्मय साहित्य

**सदा आर्जवी प्रिय जो सर्व लोकी ।**
**सदा सर्वदा सत्यवादी विवेकी ।**
**न बोले कदा मिथ्य वाचा त्रिवाचा ।**
**जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।५३।।**

अर्थ : नेहमी नम्रतेने बोलणारा आणि आपल्या मधुर वाणीने लोकांना आपलेसे करणारा, सत्यवचनी आणि विवेकी असणारा, त्याचप्रमाणे कधीही वायफळ आणि असत्य न बोलणारा असा जो परमेश्वराचा भक्त असतो तो जगामध्ये खरोखरच धन्य होय.

( आर्जवी - नम्र, मिथ्य वाचा - खोटे बोलणे, त्रिवाचा - त्रिवार /निश्चित / ठामपणे. परंतु येथे बोलण्यात एकवाक्यता नसलेला असा अर्थ घेता येतो )



विवेचन : भक्ताने कसे असावे ते या श्लोकातही समर्थ सांगत आहेत. त्याचे बोलणे आर्जवी असते. आर्जवी म्हणजे नम्र. आर्जवी म्हणजे लाचार नव्हे. ज्याला (ईश्वराचे) ज्ञान झाले आहे असा भक्त आपोआपच नम्र होतो. फळांनी लगडलेले झाड जसे झुकलेले दिसते त्याप्रमाणे खरा ज्ञानी, विद्वान आणि भगवंताचा भक्त नम्र असतो. ही नम्रता त्याला कोठून उसनी आणावी लागत नाही. ती त्याच्या आतूनच उत्स्फूर्तपणे येते.

समर्थांना मधुर बोलणे अतिशय प्रिय आहे. दासबोधामध्ये ते म्हणतात,

पेरिले ते उगवते, बोलण्यासारखे उत्तर येते।
तरी मग कर्कश बोलावे ते, काय निमित्ये ।।

आपण जसे बोलू तसे उत्तर समोरून मिळेल. मग विनाकारण दुसऱ्याला लागेल असे बोलण्यात काय अर्थ ? काही लोक बोलण्यात अत्यंत फटकळ असतात. आपल्या बोलण्याने लोकांची




मने दुखावतात. अशी माणसे अप्रिय होतात. मग भलेही ती स्वतः ला स्पष्टवक्ता म्हणवून घेतात. परंतु त्यांचा स्पष्टवक्तेपणा इतरांना जखम करणारा असतो. आपण गोंदवलेकर महाराजांची प्रवचने वाचली असतील तर त्यातील भाषा किंवा कधी के वि बेलसरे यांचे निरूपण ऐकले असेल तर त्यांचे बोलणे किती नम्र आणि मधुर होते याचा प्रत्यय आपल्याला येतो. हीच खऱ्या भक्ताची लक्षणे आहेत.

''सत्यम बृयात, प्रियम बृयात.'' गोडही बोलायचे आणि सत्यही बोलायचे ही तारेवरची कसरत असते. परंतु दुसऱ्याला न दुखवता देखील सत्य सांगता येते. असा भक्त समर्थांनी सांगितल्याप्रमाणे सदा सर्वदा म्हणजे नेहमी सत्य बोलतो. परंतु या सत्य बोलण्यात विवेकाचा वापर तो करतो.

एखाद्या अत्यवस्थ किंवा शेवटच्या घटका मोजत असणाऱ्या रुग्णाला जर आपण भेटायला गेलो आणि त्याला म्हटले की आता ही तुझी शेवटची अवस्था आहे. त्यातून तू बरा होणार नाहीस. असे बोलणे सत्य जरी असले तरी ते अविवेकाचे आहे. म्हणून अशा वेळी विवेकाचा वापर करून, '' तू बरा होणार आहेस. तुला लवकरच बरे वाटेल. '' अशा प्रकारचा धीर देणे उपयुक्त ठरते.

**(क्रमशः)**




ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏

## || संजय उवाच... ||

@संजय काव्या पुणे 7743918559



✍️ वेदना

वेदना म्हणजे दुःख, त्रास. कधीही आपणामुळे कोणाला वेदना होऊ नये याची काळजी घेतली पाहिजे हे तो करू शकतो ज्याला वेदानांची जाणीव असते.

(हे माझे मत आहे पटले तर घ्यावे)

# गुरु कशाला हवा ?



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

बाजारात गेल्यावर, जो माल आपल्याला अनुकूल आणि माफक दराचा असेल तोच घ्यावा, त्याप्रमाणे परमार्थाच्या अनेक साधनांत आपल्याला अनुकूल आणि माफक असे नामस्मरण हेच एक उत्तम साधन आहे; तेच करावे आणि आनंदाने रहावे.

व्यवहारात सुद्धा आपल्याला गुरू करावा लागतो, तर त्याच्यापेक्षा अवघड ज्ञान होण्यासाठी गुरू नको असे म्हणून कसे चालेल ? प्रपंचात सुखदु:ख झाले, समाधान मिळाले नाही, तर मग खरे सुख कुठे आहे आणि ते मला कोण दाखवील, अशी ज्याला तळमळ लागेल तोच गुरू करील. प्रपंच आम्हाला कडू वाटला तरच शिष्य होण्याचा प्रश्न. शिकावे असे ज्याच्या मनात येते तो शिष्य, आणि जो शिकवितो तो गुरू. मला काही कळत नाही असे ज्याला वाटते तोच गुरू करील. मी ' राम, राम ' म्हणतो, वाईट मार्गाने जात नाही, मग गुरु कशाला हवा, असे काहीजण म्हणतात. ' मी ' केले ही जाणीव आड येते, म्हणून सद्गुरूची आवश्यकता आहे. सत्कर्माचा अभिमान जर आपल्याकडे घेतला तर रामाचा विसर नाही का पडला ? अभिमान गेल्याशिवाय राम नाही भेटणार. देवाजवळ गेला तरी नामदेवाचा अभिमान नाही गेला, म्हणून भगवंतांनी त्याला ' गुरू कर ' म्हणून सांगितले.

संताच्या कृपेने दुखणे बरे झाले म्हणून त्याला मानणे हे खरे नव्हे. जो शिष्याला विषयात ओढील त्याला गुरू कसे म्हणावे ? जो काही चमत्कार करून दाखवील त्याला आम्ही बुवा म्हणतो. संताची परीक्षा आम्ही बाह्यांगावरून करतो. सर्वांभूती भगवंत ज्याला पहाता येईल त्याला संताची खरी ओळख होईल. संताच्या संगतीत आपल्या मनावर जो परिणाम होतो, त्यावरून आपण संताची परीक्षा करावी. माझे चित्त जिथे निर्विषय होईल तिथेच संताची खरी जागा म्हणता येईल. ज्याला भगवत्प्राप्तीची तळमळ लागली आहे, त्यालाच शिष्य म्हणावे. जो गुरुआज्ञेबाहेर जात नाही, आणि गुरू हेच भगवंतप्राप्तीचे साधन मानतो, तो सच्छिष्य होय. गुरूपरता देवधर्मच नाही मानू.

काही कानडी माणसे महाराष्ट्रात आली. त्यांना मराठी येत नव्हते. त्यांनी एक दुभाषी गाठला आणि त्याच्या मागोमाग ती पुष्कळ ठिकाणी हिंडली. त्यांची चिंता आणि जबाबदारी त्या दुभाष्यावर पडली. तशी आपण दुभाष्याची म्हणजे सद्गुरूची संगत केली पाहिजे. तो म्हणेल तिथे जावे, तो सांगेल तसे करावे, मग परमात्मा मिळेलच. शास्त्रे आणि वेद अनंत आहेत; ते शिकायला आपल्याला वेळ कुठे आहे ? सद्गुरूंनी नवनीताप्रमाणे सर्व साधनांचे सार असे जे नामसाधन सांगितले, ते आपण करावे, म्हणजे भगवंताचे प्रेम लागेलच. बाजारात गेल्यावर, जो माल आपल्याला अनुकूल आणि माफक दराचा असेल तोच घ्यावा, त्याप्रमाणे परमार्थाच्या अनेक साधनांत आपल्याला अनुकूल आणि माफक असे नामस्मरण हेच एक उत्तम साधन आहे; तेच करावे आणि आनंदाने रहावे.

भगवंताबद्दल जिज्ञासा उत्पन्न होणे ही खरी भाग्याची गोष्ट आहे. असा जिज्ञासू शिष्य भेटला तर संताला आपले स्वतःचे सार्थक झाले असे वाटते.

# || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर,
पुणे

## आपले सण,आपलेउत्सव वट सावित्री पोर्णिमा

पुढे.....

अल्पावधीतच त्यांच्या राज्याचे काही सरदार व सैनिक तिथे आले. त्यांनी असे सांगितले की, ज्या सरदाराने बंड केले होते, त्या सरदाराचा वध करण्यात आला आहे. ते म्हणाले आता तुमचे राज्य तुम्ही परत घ्या.

इकडे अश्वसेनालाही शंभर पुत्र झाले. ते सर्वशूर व क्षत्रिय निपजले. सावित्रीचा यमाशी झालेला संवाद याचा विचार करून पहा. काही क्षणापूर्वी जिचा पती गतप्राण झाला आहे, तिचे तिच्या मनावरील नियंत्रण किती मजबूत होते. ती चतुराईने यमधर्म राजाची मर्जी कशी सांभाळते व त्यांना हवे ते सगळे वर मागून घेण्यात कशी यशस्वी होते, हे पाहण्यासारखे आहे.

आपल्यासारखा सामान्य माणूस, केवळ भयग्रस्त झाला असता. किंवा आत ताई पणे केवळ त्याचे प्राण परत द्या,त्याचे प्राण परत द्या. इतकेच म्हणू शकला असता. या पद्धतीने केवळ प्राण परत येणे अशक्य झाले असते. विविध विषयात चतुराईने बोलून, यम धर्म राजाची यथा योग्य ती, स्तुती करून प्रसन्न कसे करून घ्यावे, हे सावित्री आपल्याला शिकविते. (क्रमश:)




**नाती सुखदु:खाची शिदोरी ।**
**झाली हो तरंगाची शंभरी ॥**

"नाती जपणं ही केवळ एक कला नाही, ती जगण्याची परिभाषा आहे!"जसं प्रत्येक भाषेत अक्षर, मात्रा, विरामचिन्हे यांना एक स्वतंत्र स्थान असतं; तसंच प्रत्येक नात्यालाही जीवनामधे एक विशिष्ट जागा आहे. त्याजागेचा समतोल राखणं गरजेचं असतं. कुठे थांबायचे, कुठे शांत राहायचं, कुठे आक्रमक होऊन बोलायचे. हे समजणं महत्त्वाचे! तर वाचक मित्रानो 5 महिण्यापुर्वी 13 मार्च पासून या आपल्या ई.दैनिकात मी हे "सुखदु:ख तरंग माणसाचे" सदर सुरू केले आंणि बोलताबोलता तुमच्याशी हितगूज करता करता शंभर भाग पूर्ण झाले त्याबद्दल प्रथम आपल्या दै जोतिर्मयचे संपादक आदरणीय श्रीमान संजय व्यापारीसराचे खूप खूप आभार. त्यांनी आपल्या या अनेक शहरात जाणाऱ्या पेपर मधून मला लिखाणाची संधी दिली, जागा दिली. पुनश्चः दै.च्या सर्व टिमचे मनापासून आभार.
आणि अर्थातच वाचकहो आपलेही आभार. आपण फोन करून प्रतिसाद दिला. प्रतिक्रिया दिल्या. तसे पुढेही द्या, वाचत रहा. काही सुधारणा, चुका झाल्यास सांगा. मी 15 दिवसापूर्वी श्री संजयजीना विचारले की,सर आपल्या तरंगाला 75 पूर्ण होत आहे, तर बघा ऐका मित्रांनो, सरांनी रिप्लाय केला.."लवकरच शतक..आणि मग 500 पर्यत जाऊ.!" तर असंच प्रेम ठेवा.. आपला पेपर वाचत चला. लाईक कंमेट करा.. स्वस्थ रहा मस्त राहा सुख दु:खाचे तरंग माणसा-माणसाचे वाचत राहा.



# 'मध' अनेक समस्यांना दूर ठेवण्यासाठी फायदेशीर

ज्योतिर्मय साहित्य

मध खनिजे, जीवनसत्त्वे आणि इतर पोषक तत्वांचा संग्रह आहे. रोगप्रतिकार शक्ती बळकट करण्याव्यतिरिक्त, मध अनेक प्रकारच्या समस्या दूर करण्यात देखील प्रभावी आहे.

आजच्या काळात प्रत्येकाने आपल्या आरोग्याबाबत सतर्क होण्याची गरज आहे. विशेषतः प्रत्येकाला आपली प्रतिकारशक्ती बळकट करण्याची गरज आहे. अशा परिस्थितीत आपल्यासाठी मधाचे सेवन करणे फायदेशीर ठरू शकते. मध खनिजे, जीवनसत्त्वे आणि इतर पोषक तत्वांचा संग्रह आहे. रोगप्रतिकार शक्ती बळकट करण्याव्यतिरिक्त, मध अनेक प्रकारच्या समस्या दूर करण्यात देखील प्रभावी आहे. आयुर्वेदात याचा उपयोग सर्व रोग बरे करण्यासाठी केला जातो. चला तर, जाणून घेऊया मधातील या औषधी फायद्यांविषयी अधिक माहिती...

मधापासून घरगुती उपचार :

खोकल्याचा त्रास बराच काळ बरा होत नसेल, तर मधाचे सेवन करणे खूप उपयुक्त ठरू शकते. मधात बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारे गुणधर्म असतात, जे संसर्ग रोखतात. तसेच, मध कफ सहजपणे काढून टाकतो. आपण एखादा चमचा नुसता मधही खाऊ शकता. याशिवाय आल्याच्या रसामध्ये मध मिसळून खाल्याने कफ आणि खोकल्यात खूप आराम मिळतो.

वजन कमी करण्यासाठी देखील मध खूप उपयुक्त आहे. त्यात अजिबात चरबी नसते. याशिवाय मध कोलेस्टेरॉलची पातळी देखील नियंत्रित करतो. वजन कमी करण्यासाठी आपण कोमट पाण्यामध्ये मध मिसळून, ते पाणी सकाळी रिकाम्या पोटी पिऊ शकता.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

घसा खवखवणे या समस्येतून आराम देण्यासाठी देखील मध फार प्रभावी आहे. जर, तुम्हाला घसा खवखवणे किंवा घसा दुखण्याची असेल, तर मध सेवन केल्यास खूप आराम मिळेल.

बद्धकोष्ठता हे बऱ्याच रोगांचे मूळ आहे. बद्धकोष्ठतेचा त्रास दूर करण्यासाठी मधाचे सेवन खूप फायदेशीर ठरते. नियमित सेवन केल्यास पोटातील गॅस आणि अपचनापासूनही मोठा आराम मिळतो.

मधात बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारे आणि विरोधी दाहक गुणधर्म असतात. कोणत्याही ठिकाणी सूज किंवा वेदना असल्यास किंवा जखम झाली असल्यास थेट त्या जागी मध लावू शकता. यामुळे भरपूर आराम मिळेल.

जर तुमची त्वचा खूप कोरडी असेल, तर त्वचेमध्ये नैसर्गिक ओलावा येण्यासाठी मधाचा वापर केला जाऊ शकतो. यासाठी आपण केवळ मध चेहऱ्यावर फेसपॅक म्हणून वापरू शकता.

***

# प्रभातपुष्प

## षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

**तूच माझा ईश्वर**

तूच माझा ईश्वर
हे मी जाणूनी
तुझी पूजा करते
मुखी नाम घेता
आनंद मना होवून
तुझेच गीत गाते

तूच आदि-अंत
माझा सखा-सोबती
सुखाचा मार्ग दाखवणारा
तूच माझा ईश्वर
भक्तसखा आहेस छान
संकटात साथ देणारा

# समाजप्रबोधनाचा संदेश देणाऱ्या '१७ वाय' लघुपटाचे दिमाखदार प्रदर्शन

## चित्रपट निर्माते सुरेश तांदळे यांच्या ६३ व्या वाढदिवसानिमित्त कलाकारांचा भव्य गौरव सोहळा संपन्न

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर - समाजाला सकारात्मक विचारांची दिशा देणाऱ्या '१७ वाय' या आशयघन लघुपटाचे भव्य प्रदर्शन तसेच ज्येष्ठ चित्रपट निर्माते सुरेश तांदळे यांच्या ६३ व्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेला गौरव सोहळा शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथील आयटी विभागाच्या सेमिनार हॉलमध्ये उत्साहपूर्ण, दिमाखदार आणि कलात्मक वातावरणात दिनांक ७ जुलै २०२६ रोजी संपन्न झाला. कला, संस्कार, समाजप्रबोधन आणि माणुसकीचा सुंदर संगम घडविणाऱ्या या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे, विविध क्षेत्रातील मान्यवर, लघुपटातील कलाकार, सुरेश तांदळे यांचे नातेवाईक, अभियंता मित्रमंडळ , पत्रकार तसेच कला-संस्कृतीप्रेमी रसिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि नटराज पूजनाने झाली. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. प्रारंभी सुप्रसिद्ध बासरीवादक श्री.अमोल कुमावत यांनी आपल्या सुरेल बासरीवादनाने संपूर्ण सभागृहात भक्तिमय आणि प्रसन्न वातावरण निर्माण केले. त्यांच्या मनमोहक स्वरांनी उपस्थित रसिक अक्षरशः मंत्रमुग्ध झाले.यानंतर पाशा खान आणि प्रा. शहनाज खान यांनी आपल्या मधुर आवाजातील सुरेल गीतांनी कार्यक्रमाची रंगत आणखी खुलवली. विजयकुमार रामदासी यांनी अत्यंत भावपूर्ण शैलीत सादर केलेल्या ''कानडा राजा पंढरीचा'' या भक्तिगीताने संपूर्ण सभागृह भक्तिरसात न्हाऊन निघाले. त्यानंतर प्रशांत नानकर यांनी आपल्या सुरेल गीतांनी रसिकांची मने जिंकत कार्यक्रमाला सांगीतिक परिपूर्णता प्राप्त करून दिली. या संगीत मैफलीने संपूर्ण सभागृहात उत्साह, भक्ती आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले.यानंतर चित्रपट निर्माते सुरेश तांदळे यांच्या ६३ व्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या पत्नी सौ. विजया तांदळे यांनी पारंपरिक पद्धतीने औक्षण केले. त्यानंतर मान्यवरांच्या उपस्थितीत केक कापून वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत दीर्घायुष्य, उत्तम आरोग्य आणि यशस्वी सामाजिक व कलात्मक वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव केला.

यावेळी '१७ वाय' लघुपटाच्या निर्मितीमागील परिश्रम, समर्पण आणि कलात्मक प्रवास उलगडणारा बीहाइंड द स्क्रीन ()  व १७ वाय या लघुपटाला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याच्या विडिओ क्लिप्स दाखवीण्यात आल्या . त्यानंतर उपस्थितांनी समाजप्रबोधनाचा प्रभावी संदेश देणाऱ्या '१७ वाय' या लघुपटाचे प्रदर्शन अनुभवले. लघुपटातील आशय, प्रभावी पटकथा, सशक्त अभिनय आणि वास्तववादी मांडणीमुळे उपस्थित प्रेक्षकांनी त्याचे भरभरून कौतुक केले.

प्रमुख पाहुणे प्राचार्य संजय डंभारे यांनी आपल्या मनोगतात लघुपटाचे



विशेष कौतुक करताना सांगितले की, '''१७ वाय' हा केवळ मनोरंजनासाठी तयार झालेला लघुपट नसून समाजाला अंतर्मुख करून सकारात्मक विचारांची प्रेरणा देणारा प्रभावी कलाविष्कार आहे. यापूर्वी महाविद्यालयाची डॉक्युमेंटरी तयार करताना मला सुरेश तांदळे यांच्यासोबत काम करण्याची संधी मिळाली. त्यांची सकारात्मक विचारसरणी, सामाजिक बांधिलकी आणि कलेप्रती असलेली निष्ठा प्रेरणादायी आहे. वय हा त्यांच्यासाठी केवळ एक आकडा असून आजही ते ज्या उत्साहाने कार्यरत आहेत, त्यांच्याकडून प्रत्येकाने प्रेरणा घ्यावी.'' असे सांगत त्यांनी सुरेश तांदळे यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

डॉ. संजीव मुंडे यांनी त्यांचे भाषणात सुरेश तांदळे यांनी मोठ्या पडद्या वरील चित्रपट न काढता अशाच प्रकारचे सामाजिक लघुपट काढून सामाजिक संदेश दयावा असे सांगितले,तर ऍड राजेंद्र सानप यांनी सुरेश तांदळे यांनी असेच समाज कार्य करत राहावे असे बोलून वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या.

✻ श्री. किरण यंबल यांनी आपल्या मनोगतात तांदळे सरांना वाढदिवसाच्या तसेच फिल्म अवॉर्डसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. सेवानिवृत्तीनंतरही तांदळे सर उत्साहाने व जिद्दीने कलाक्षेत्रात कार्यरत आहेत, ही अत्यंत कौतुकास्पद बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच, तांदळे सरांनी या सर्व गुणी कलाकारांना सोबत घेऊन मोठ्या पडद्यावर चित्रपट निर्माण करावा, अशी अपेक्षा व्यक्त करत '१७ ' चित्रपटातील सर्व कलाकारांचे अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या✻.

✻ श्री. प्रशांत नानकर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, तांदळे सर स्वभावाने अत्यंत शिस्तप्रिय व कडक स्वभावाचे असून सडेतोडपणे आपले मत व्यक्त करणारे व्यक्तिमत्त्व आहेत. मात्र, त्यांच्या या कणखर व्यक्तिमत्त्वामागे एक अत्यंत संवेदनशील आणि सहृदय माणूस दडलेला आहे. गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देताना त्यांच्या मनातील ही संवेदनशीलता प्रकर्षाने जाणवते. जास्तीत जास्त गरजू विद्यार्थ्यांना मदत मिळावी, हा त्यांचा नेहमीच प्रामाणिक हेतू असतो. त्यांच्या या कार्यातून त्यांच्या अंतःकरणातील सहृदय, माणुसकी जपणाऱ्या आणि सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडते.✻

चित्रपटात  भूमिका करणारी कलाकार कंठी पेलमहाले हिने तिच्या पहिल्याच चित्रपटाचा अनुभव सादर केला. पात्रासाठी निवड करण्यापासून प्रत्येक टप्प्याला  तांदळे सर यांनी कशा प्रकारे तिला व इतर सर्व कलाकारांना सांभाळून घेतले, अमूल्य असे मार्गदर्शन केले ह्याचा सखोल अनुभव मांडत त्यांचे आभार मानले व उदंड निरोगी आयुषासाठी शुभेच्छा दिल्या.

१७ वाय मधील -कलाकार निकिता खरात हिने देखील शूटिंग मधले रंजक किस्से, शिकायला मिळालेल्या नवीन गोष्टी आणि नट म्हणून अनुभवात झालेली भर ह्याबद्दल सांगून आभार व्यक्त केले. ''आज आम्ही छोट्या पडद्यावर आहोत , पण एके दिवशी नक्की मोठ्या पडद्यावर स्वतःला बघू '' असे म्हणत तांदळे सरांनी दिलेल्या सर्व मार्गदर्शनाबद्दल आभार व्यक्त केले.

यावेळी सुरेश तांदळे यांनी आपल्या मनोगतात '७     या निर्मिती संस्थेच्या नावामागील संकल्पना उलगडून सांगितली. ''प्रत्येक चित्रपट, लघुपट किंवा कलाकृती ही समाजाचा आरसा असते. समाजातील वास्तव, संघर्ष, भावना आणि सकारात्मक बदल यांचे प्रतिबिंब कलेतून उमटले पाहिजे. मनोरंजनासोबत समाजप्रबोधन हेच आमच्या प्रत्येक निर्मितीमागील प्रमुख ध्येय असून, भविष्यातही सामाजिक आशय असलेल्या दर्जेदार कलाकृतींची निर्मिती सुरूच राहील,'' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या प्रसंगी '१७ वाय' लघुपटाच्या निर्मितीत विविध स्तरांवर मोलाचे योगदान देणाऱ्या २७  मान्यवरांचा प्रशस्तीपत्र, स्मृतिचिन्ह आणि ट्रॉफी देऊन गौरव करण्यात आला. सहनिर्माता, कास्टिंग डायरेक्टर, कलाकार, अभिनेत्री, बालकलाकार, मेकअप आर्टिस्ट, वाहतूक व्यवस्था तसेच  उपक्रमाशी संबंधित मान्यवरांचा या गौरवामध्ये समावेश होता.

कार्यक्रमाचे प्रभावी प्रास्ताविक विजयकुमार रामदासी यांनी केले. संपूर्ण कार्यक्रमाचे प्रभावी, ओघवते आणि उत्स्फूर्त सूत्रसंचालन अभियंता सीमा गाडेकर यांनी केले.

ॲड. स्वराज तांदळे यांनी उपस्थित सर्व मान्यवर, कलाकार, सहकारी आणि रसिकांचे आभार मानले.  १७ वाय च्या मागे असलेली संकल्पना समजावत त्यांनी आर्य चाणक्य ह्यांचे  लिहिलेले वाक्य ''न स्त्रीरत्नसमं रत्नम'' ह्याचा उल्लेख करत सर्व स्त्रिया अमूल्य आहेत, उच्च स्थानी आहेत आणि स्त्री सारखा दागिना ह्या समाजात दुसरा कोणताच नाही म्हणून अदिव्य, देवी रुपी स्त्री चे रक्षण आणि सन्मान सर्वांनी केलाच पाहिजे असा संदेश देखील दिला.

या संस्मरणीय सोहळ्यास श्री देविदास गोरे, राजानंद सरडे, शशिकांत येरनाले, दीपक गाडेकर, सुरेश शक्करवार, स्मिता कासार, शुभांगी सपकाळ, स्मिता चव्हाण, डॉ.राजाराम दमगीर, मकरंद राजेंद्र, रंगनाथ चव्हाण, दिलीप चितलांगे, शेख खमर उत्तम काळवणे, भास्कर चाटे, सौ. अल्का मुंडे, विष्णू ढाकणे, रोहिदास मस्के, अच्युत भोसले, गोकुळ तांदळे,अप्पासाहेब आंधळे,आरती पेलमहाले, श्री तुषार थोरात, सौ.लक्ष्मी थोरात,सौ.आशा ढाकणे,देविदास सिरसाट, उमेश निकाळजे, कल्पना बन्सोड, सौ.आशा वाघ ई मान्यवर सह कलाकार डॉ. प्रमोद हिवरेकर योगेश बोर्डे, अजय मोरे, सुलतान शिकलगार, संतोष वारे, पवन कांबळे, निया वीभुते, आकांक्षा वाघ ,तनिष्का बनसोडे, सुजाता पारखे, आकांक्षा कांबळे,जानव्ही दैठणकर, प्रणव मोरे,विक्रांत अजिंक्य,किशोर नाटकर, विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच कला आणी संस्कृतीप्रिय रसिक यांनीही सुरेश तांदळे यांना शुभेच्छा  दिल्या. समाजप्रबोधन, संगीत, संस्कृती आणि कलेचा सुंदर मिलाप घडविणारा हा सोहळा उपस्थितांच्या मनावर कायमस्वरूपी ठसा उमटवून गेला. '१७ वाय' या लघुपटातून समाजाला दिलेला सकारात्मक संदेश, कलाकारांचा गौरव आणि सुरेश तांदळे यांच्या कार्याचा सन्मान यामुळे हा कार्यक्रम सर्वार्थाने अविस्मरणीय ठरला. १७ वाय ✻लघुपट  सर्वांना पाहण्यासाठी सुरेश तांदळे यांच्या ७    या    चॅनेल वर प्रदर्शित करण्यात आलेला आहे.

---

# जनसामान्यांचे कैवारी : लोकशाहीर अण्णा भाऊ साठे (पुण्यतिथी-१८जुलै)

**ज्योतिर्मय साहित्य**

''जग बदल घालुनी घाव-सांगून गेले मज भिमराव''

अशी वाघ ललकारी देणारे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे महाराष्ट्राचे अनमोल रत्न होत. आपल्या पहाडी आवाजाने महाराष्ट्र चळवळ उभी करणारे अफलातून व्यक्तिमत्व आणि हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा कुळवाडी भूषण पोवाडा थेट रशिया देशात जाऊन  गाणारे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे म्हणजे महाराष्ट्र राज्याला मिळालेली अनमोल देणगी होय. साहित्य रचना-फकिरा, वारणेचा वाघ, माकडीचा माळ, चिखलातील कमळ, वैर, तसेच गजाआड माझा रशिया प्रवास अशा असंख्य साहित्य निर्मितीने अण्णाभाऊ साठे आजही चिर स्मरणात आहेत. अण्णाभाऊ साठे यांचा जन्म १ऑगस्ट,१९२०

रोजी वाटेगाव ता, वाळवा जि.सांगली येथे झाला. त्यांचे जन्म नाव तुकाराम भाऊराव साठे असे आहे तर टोपण नाव अण्णाभाऊ साठे असे आहे. ते फक्त दीड

दिवसच शाळेत गेले होते. त्यांची ओळख म्हणजे त्यांचे लेखन कार्य होय.वर्ष १९३२ साली ते वडिलांबरोबर मुंबई ला आले.चरितार्थ साठी कोळसा वेचणे, फेरीवाल्यांच्या पाठीशी




गाठोडे घेऊन हिंडणे, गिरणीत झाडूवाला म्हणून काम करणे, ही कामे अण्णा भाऊ करू लागले. हे काम करीत असताना दुकानांच्या पाट्या वाचून ते शिकले. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांचा सहभाग होता त्यामुळे ब्रिटिश सरकारने त्यांच्या बिरोधात वारंट काढले होते.



धोंडीरामसिंह ध. राजपूत
वैजापूर, छत्रपती संभाजीनगर
मो. ९४२१३१२२४४

दलित आणि श्रमिक यांच्या समृद्धीचे स्वप्न ते पाहत होते.ही पृथ्वी शेष नागाच्या मस्तकावर तरलेली नसून श्रमिक, दीन, दलित यांच्या हातावर तरलेली आहे  असे ते ठणकावून सांगत असत.त्यांनी १९४४ साली लाल बावटा पथक ही स्थापन केले होते,या पथकावर इंग्रज सरकारने बंदी टाकली होती. अण्णाभाऊ साठे ज्या समाजात जन्मले त्या समाजाला परिपूर्णपणे उभे करण्याचे काम त्यांनी केले.त्यांच्या व्यथा जाणून त्या जगासमोर व तत्कालीन ब्रिटिश सरकार समोर आणून. या समाजाला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न त्यानी केला. अण्णाच्या लेखनाचे विषय हे समाजातील विविध स्तरांवर काम करणाऱ्या दीन, दुबळे, तमासगीर, नंदी बैलवाले, डोंबारी, भिकारी, गुंड असे होते. अण्णाचे कार्य महाराष्ट्राच्या सामाजिक जडणघडण साठी होते. ''जगा आणि जगू द्या''ही विचार सरणी त्यानी आयुष्यभर जपली अशा या थोर जनसामान्यांचे कैवारी असलेले अण्णा भाऊ साठे हे १८जुलै, १९६९साली पंचतत्वात विलीन झाले.

✻✻✻




**सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....**



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.

■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,

गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.

सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

**Dr Shaikh A H - 98606 99906**

---



## महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

### 'आजी' (संस्कारांची शिदोरी)

पुढे.......

आजी केवळ गोष्टी सांगत नसायची, तर त्या गोष्टींच्या रंजक माध्यमातून ती मुलांच्या नकळत त्यांच्या कोऱ्या मनावर 'नैतिकतेची' आणि 'संस्कारांची' पेरणी करत असायची. तिने लावलेली 'शुभंकरोती'ची आणि रामरक्षेची सवय मुलांच्या आयुष्याला अंतर्गत शुद्धता देऊन जाते आणि आयुष्यभर हे संस्काराचे देणे माणसाला सुखद जगण्यासाठी उपयोगी पडते.

पण कधी कधी मनात अशी शंका येते की, आपण भौतिक सोयी-सुविधा मिळवून खरंच प्रगती करत आहोत का? कारण आजी-आजोबांसारखे मायेचे वटवृक्ष आज घराघरातून नाहीसे होताना दिसत आहेत. आज एकविसाव्या शतकाच्या उत्तरार्धात, बदलत्या कौटुंबिक चौकटीमुळे हे चित्र तर खूपच बदलले आहे. एकत्र कुटुंब पद्धती जाऊन 'विभक्त कुटुंबे' आली आणि शहरीकरणाच्या फ्लॅट संस्कृतीमध्ये आजची लहान मुले आजीच्या या अथांग मायेला मुकत चालली आहेत.

आई-बाबा दोघेही नोकरीवर गेल्यावर मुले पाळणाघरात किंवा मोबाईलच्या स्क्रीनमध्ये डोके खुपसून बसलेली दिसतात. मोबाईलवरील 'यूट्यूब'च्या स्क्रीनवर निर्जीव आवाजात गोष्टी ऐकणे आणि आजीच्या उबदार कुशीत तिच्या हृदयाची जिवंत धडधड ऐकत गोष्ट ऐकणे, यातील जमीन-अस्मानाचा फरक आजच्या डिजिटल पिढीला समजणार कसा?

आजच्या काळाची ही मोठी शोकांतिका आहे की, ज्या आजीच्या पंखांखाली संपूर्ण घर सुरक्षित राहायचे, ती आजी आज अनेक ठिकाणी वृद्धापकाळात एकाकी पडलेली दिसते.

आयुष्याच्या या संध्याकाळी तिला पैशांपेक्षा आपल्या मुलांच्या आणि नातवंडांच्या दोन गोड शब्दांची, त्यांच्या वेळेची भूक असते. ज्याप्रमाणे वाळलेल्या पानांनी कधीकाळी आपल्याला रखरखत्या उन्हात मायेची सावली दिली होती, तसेच आजीच्या पिकलेल्या केसांचा आणि तिच्या सुकून गेलेल्या हातांचा आदरयुक्त सन्मान करणे ही आपली सर्वांची नैतिक जबाबदारी आहे.

नात्यांच्या या भरजरी 'महावस्त्रा'चा हा आजी नावाचा पदर आपल्या संस्कृतीचे खरे वैभव आहे. ही आपली ठेवणीतली पैठणी आहे. ही मायेची सावली घरात जपणे आणि तिच्या अनुभवाचे गाठोडे पुढच्या पिढीकडे आदराने सुपूर्द करणे, हीच खऱ्या अर्थाने या महावस्त्राची वीण घट्ट करणे आहे. संस्कृती, संस्कार आणि प्रेम जपायचं असेल आणि ते पुढील पिढीकडे सुरक्षित सुपूर्द करायचं असेल, तर 'आजी' ही गोष्ट कुटुंबातून कधीही 'माजी' होता कामा नये! ही तुमची, आमची आणि या समाजाची संयुक्त जबाबदारी आहे.

---

## वारीतील समता माणुसकीचा खरा धर्म



अमोल बोरीकर



वारीच्या वाटेवर चालताना एक अद्भुत दृश्य दिसतं. एका रांगेत शेतकरी चालतो, त्याच्या शेजारी डॉक्टर असतो. एकीकडे उद्योगपती असतो, तर दुसरीकडे मजूर. कुणी श्रीमंत, कुणी गरीब... कुणी उच्च, कुणी निम्न... पण दिंडीत पाऊल टाकताच या साऱ्या ओळखी मागे पडतात. तेथे प्रत्येकाला एकच नाव मिळतं -"माऊली!"

किती मोठा विचार आहे हा! जन्मभर माणसाने स्वतःभोवती भिंती उभ्या केल्या—जात, धर्म, पैसा, पद, प्रतिष्ठा आणि अहंकाराच्या. पण वारीत त्या सगळ्या भिंती एका क्षणात कोसळतात. येथे एका ताटात सगळे जेवतात, एकाच पाण्याचा घोट पितात, एकाच अभंगात हरवतात आणि एकाच विठ्ठलाच्या चरणी माथा टेकवतात.

संत ज्ञानेश्वर यांनी "अवघाचि संसार सुखाचा करीन" हे स्वप्न पाहिलं आणि तुकाराम यांनी "जे का रंजले गांजले..." म्हणत माणुसकीलाच धर्म मानला. त्या संतविचारांचा जिवंत श्वास म्हणजे वारी.

येथे माणूस मोठा नसतो, त्याचं मन मोठं असतं. हात जोडण्यापेक्षा दुसऱ्याचा हात धरणं अधिक पवित्र मानलं जातं.

आजच्या समाजात नावापुढील पदवी, जातीची ओळख, आर्थिक स्थिती आणि सामाजिक प्रतिष्ठा यावर माणसाचं मोजमाप केलं जातं. त्यामुळे नाती तुटतात, मनं दुरावतात. पण वारी एक साधा प्रश्न विचारते—शेवटी आपण सगळे विठ्ठलाची लेकरंच नाही का?

आज समाजाने माणसामाणसांत इतक्या भिंती उभ्या केल्या आहेत की, शेजारी राहणाऱ्या माणसाचंही दुःख आपल्याला दिसत नाही. नावापुढे आडनाव, जातीपुढे अभिमान, पैशापुढे माणुसकी आणि पदापुढे प्रेम हरवत चाललं आहे.

पण वारी या सगळ्या भिंती एका क्षणात पाडते. ती शिकवते—

दुसऱ्याच्या पायाला फोड आला तर तो तुझ्याही वेदनेचा भाग आहे...

दुसऱ्याच्या डोळ्यात अश्रू आले तर ते पुसण्यासाठी तुझा हात पुढे यायला हवा...

दुसरा उपाशी असेल तर तुझ्या ताटातील अर्धी भाकरी त्याची आहे...

हीच समता आहे... आणि हाच खरा धर्म आहे.

पंढरीची वारी म्हणजे केवळ माणसांचा समूह नाही, तर ती एकाच विठ्ठल माऊलीच्या गर्भातून जन्माला आलेल्या लेकरांची जिवंत मांदियाळी आहे.

पंढरपूरच्या मंदिरात विठ्ठल एका विटेवर उभा आहे; पण वारीच्या रस्त्यावर तो लाखो हृदयांत चालत असतो. तो प्रत्येकाला सांगत असतो—

"माझ्या दर्शनासाठी मंदिरात येण्यापूर्वी, एखाद्या माणसाला आपलं मानून बघ."

वारीचा खरा चमत्कार विठ्ठलाचं दर्शन नाही... तर अनोळखी माणसाला आपलंसं मानताना डोळ्यांत दाटून येणारा तो ओलावा आहे. त्या एका अश्रूत धर्म आहे, भक्ती आहे, समता आहे... आणि त्या अश्रूचं नाव आहे – माणुसकी.

---

## कृतज्ञ मी कृतार्थ मी भगवंत हृदयस्थ आहे

© अपर्णा परांजपे कात्रज पुणे मो.95030 45495



### सत्यम् अनंतम् शाश्वतम् ब्रह्म




धर्म म्हणजे बाह्य रूढी नव्हे; तर सत्य, दया, न्याय, प्रेम आणि लोककल्याण. म्हणूनच संतांचा मार्ग हा सुवर्णमध्याचा मार्ग आहे.

महाभारत म्हणते—

पुराणमित्येव न साधु सर्वं
न चापि काव्यं नवमित्यवद्यम्।
सन्तः परीक्ष्यान्यतरद्भजन्ते
मूढः परप्रत्ययनेयबुद्धिः॥

जुने आहे म्हणून सर्वच चांगले नसते; नवे आहे म्हणून सर्वच वाईट नसते. ज्ञानी पुरुष विवेकाने परीक्षण करून जे हितकारक आहे त्याचाच स्वीकार करतात. भगवद्गीतेत भगवान श्रीकृष्ण म्हणतात—

युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु ।
युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दुःखहा ॥
(गीता ६.१७)

यातून समतोल, संयम आणि युक्ती हेच धर्माचे स्वरूप असल्याचे स्पष्ट होते.

■ भारतीय संस्कृतीचा संदेश स्पष्ट आहे—

"शाश्वत तत्त्वे जपा; कालबाह्य रूढी सुधारा;
आणि नवीन विचार विवेकाच्या कसोटीवर तपासून स्वीकारा." हाच सुवर्णमध्य, हाच सनातन धर्म आणि हाच संतपरंपरेचा मार्ग आहे.

■ भारतीय जीवनदृष्टी सांगते—

"जे शाश्वत आहे ते जपा; जे कालबाह्य झाले आहे ते सुधारा;आणि जे नवीन आहे ते विवेकाच्या कसोटीवर तपासून स्वीकारा."

हाच सुवर्णमध्य आहे. यालाच भगवान श्रीकृष्ण 'युक्त', उपनिषदे 'समन्वय', शंकराचार्य 'विवेक', तर संत ज्ञानेश्वर 'समत्व' असे संबोधतात.

"अति सर्वत्र वर्जयेत्."अति रूढीवादही हितकारक नाही आणि अति आधुनिकताही नाही. विवेकाने स्वीकारलेला समतोल हाच सनातन धर्माचा खरा मार्ग आहे.

जय जय रघुवीर समर्थ 🙏

# अमेरिका दर्शन : नायगारा फॉल

ज्योतिर्मय साहित्य



जगप्रसिद्ध नायगारा धबधबा पाहणे ही आयुष्यातील दुर्मीळ पर्वणीच होती त्यामुळे ती उत्सुकता लागून राहिली होती. दिवसभर त्या कोच च्या काचेच्या खिडकीतून होणारे अमेरिकेचे दर्शन घेत आमचा प्रवास सुरू होता. वाटेत ''काऊ केव्हस'' या ठिकाणी जमिनी खालील ऐतिहासिक अशा नैसर्गिक गुहेच्या शेवट पर्यंत जाऊन पाहून आलो. या गुहेचा शोध एका गायी चारणाऱ्या गोपाळकाला लागला असे म्हणतात आपल्या दोन गायी चा शोध घेत तो या गुहेजवळ आला आणि आपल्या गायी याच गुहेत गेल्या असाव्या म्हणून तो ही त्या गुहेत उतरला व जमिनीखाली बराच अंतर पुढे गेला तेव्हा त्या गायींना परत फिरता येऊ शकत नसल्याने त्या मृत्युमुखी पडल्या अशी त्याची खात्री पटली. तेव्हा पासून या गुहेला काऊ केव्हस म्हणतात अशी कथा येथे वाचायला मिळाली गुहेत खाली उतरून चालत जाणे अवघड होते एकच माणूस चालू शकेल एवढीच जागा होती तरीही आम्ही शेवटपर्यंत पाहून आलो. तिथून पुढे एका ठिकाणी जेवणासाठी बस थांबली पण ते चायनीज हॉटेल होते त्यामुळे आम्ही सोबतचे फराळाचे खाऊन बस मधेच थांबलो.

पुढे प्रवास करत सायंकाळी आम्ही नायगारा येथील हॉटेलला पोचलो. रूम चेक इन केले आणि लगेच पराकोटीची उत्सुकता असलेला जगप्रसिद्ध नायगारा फॉल बघायला गेलो.त्यावेळी तिकडे संध्याकाळ झाली होती दुरूनच धबधब्याचा प्रचंड आवाज येत होता आम्ही जवळ पोचेपर्यंत रंगीबेरंगी रोषणाईचे लाईट लागले त्या प्रकाशात जगप्रसिद्ध नायगारा फॉल चे भव्य रूप खुलून दिसत होते ते पाहून मन भरून आले थोडा वेळ फोटोग्राफी करून आम्ही परत आलो.तिथे पंजाबी व्हेजिटेरियन रेस्टॉरंट होते पंजाबी जेवण मिळाल्याने मस्त जेवण केलं आणि आमची रहाण्याची व्यवस्था असलेल्या हॉटेलला आलोत. सायंकाळच्या वेळी नायगारा पहिला पण समाधान झाले नव्हते त्यामुळे सर्वच जण सकाळीच पुन्हा एकदा नायगारा चे सौंदर्य पाहण्यासाठी गेलो कोवळ्या उन्हात खळखळून वाहत येणारा प्रवाह नायगाराचा फेसाळलेला धबधबा बनून प्रचंड उंचावरून खाली कोसळत होता आणि वाऱ्यामुळे त्याच्या उडणाऱ्या तुषारांमध्ये इंद्रधनुष्य दिसत होते. खरोखरच डोळ्याचे पारणे फेडण्यासारखे नयनरम्य सुंदर असे ते दृश्य कितीही वेळ बघतच रहावे असे वाटते . ब्रेकफास्ट करून आम्हाला पुढे निघायचे होते त्यामुळे नायगाराला डोळ्यात आणि कॅमेऱ्यात साठवून आम्ही निघालो.

वामन कोठेकर पुणे
मो.९८६०६९९९७२



वॉशिंग्टन डी सी

अमेरिकेची राजधानी असलेल वॉशिंग्टन शहर बघण्यासाठी आमचा प्रवास सुरू झाला होता वाटेत हॉटेलला एक मुक्काम करून आम्ही वॉशिंग्टन मध्ये पोचलो सकाळी अब्राहम लिंकन चा भव्य पुतळा पाहिला नंतर अमेरिकन संसद बाहेरून बघितली तिथे काही रिनोवेशन चे काम चालू होते नंतर जवळच असलेल्या स्पेस सायन्स म्युझियम मध्ये विविध लहान मोठी विमाने, अवकाश यान, मॉडेल्स बघितली आणि मग अमेरिकेच्या राष्ट्रअध्यक्षांच जगप्रसिध्द व्हाईट हाऊस बघायला गेलो. प्रचंड मोठ्या आवारातील लॉन च्या मध्यभागी असलेले व्हाईट हाऊस दुरूनच बघता येत होत. अमेरिकन प्रेसिडेंट चे निवासस्थान असल्याने सुरक्षा व्यवस्था चोख होती संपूर्ण आवाराला लोखंडी तटबंदी होती दर शंभर मीटरवर हत्यार बंद गार्ड तैनात होते . लोखंडी गजामधून व्हाईट हाऊस दिसत होत तिथेही आणि छतावर सिक्युरिटी गार्ड तैनात होते . दुरूनच फोटो काढता येत होते तसे फोटो काढून आणि पुन्हा एकदा व्हाईट हाऊस डोळेभरून बघून परत निघालो.

फिलाडेल्फिया

पुढचा प्रवास हा फिलाडेल्फिया हे शहर पाहण्यासाठी होता. फिलाडेल्फिया ही वॉशिंग्टन च्या आधी काही काळ अमेरिकेची राजधानी होती. तेथील राजेशाही घोडाबग्गी जुन्या राजधानीची साक्ष देत होती.तेथील प्रचंड स्वातंत्र्य घंटा लिबर्टी बेल आणि इंडिपेन्डेन्स हॉल स्वातंत्र्य सभागृह ही आता स्वातंत्र्य स्मारक म्हणून ओळखली जाते इथेच स्वातंत्र्याच्या करारावर स्वाक्षरी करण्यात आली होती आणि अमेरिका स्वतंत्र देश म्हणून घोषित झाली होती. तेथील फुललेले ट्युलिप गार्डन सुंदरच होते. तेथील सुंदर इमारती पूर्वीच्या राजधानीचा इतिहास दर्शवत होत्या. परतीच्या प्रवासात पुन्हा न्यूयॉर्क ला जाऊन न्यूयॉर्क शहर दर्शन करायचे होते त्यानुसार आम्ही निघालो. वाटेत कॉर्निंग ग्लास आर्ट म्युझियम आणि ग्लास आर्टिकल फॅक्टरी ला भेट दिली तेथील काचेच्या अगदी लहान लहान कलात्मक वस्तू पासून ते काचेचे प्रचंड मोठे झुंबर, मुर्त्या आणि इतर सुंदर अशा कलाकृती पाहिल्या. तेथे प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे काचेपासून सुंदर कलाकृती करताना दाखवणेत आले . **(क्रमशः)**

# वाङ्मयीन दृष्टी लाभलेले साहित्यिक - शाहिर अण्णा भाऊ साठे

ज्योतिर्मय साहित्य



१९५८ मध्ये मुंबईत पहिले दलित साहित्य संमेलन झाले. या संमेलनाचे उद्घाटक शाहीर अण्णाभाऊ साठे होते. आपल्या भाषणात अण्णाभाऊंनी महत्त्वाचे विचार मांडले. ते म्हणाले पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर नव्हे तर कष्टकरी व श्रमिकांच्या तळहातावर तरलेली आहे. दलित म्हणजे कामगार, कष्टकरी, शोषित, पिडीत, उपेक्षित, वंचित, सर्वहारा सर्व श्रमिक या अर्थाने तो होता. त्यांनी युगानुयुगाचे समज एका क्षणात नष्ट होत नसतात. म्हणून आम्ही दलित साहित्यिकांनी दलितांना वास्तविक जगाच्या सर्व जुलूमातून मुक्त केले पाहिजे. हा विचार मांडला होता.

त्यांची ही भूमिका दलित साहित्य चळवळीला आणि एकूणच परिवर्तनाच्या चळवळी निर्माण करणाऱ्या लेखक,सामाजिक कार्यकर्ते आणि नेते मंडळींना कायम प्रेरक मार्गदर्शक ठरणारी अशीच आहे.अण्णाभाऊचे लेखन हे जीवनसृष्टी आणि वाङ्मयीन दृष्टी व्यक्त करणारे वास्तववादी होते. म्हणूनच अण्णा भाऊंनी म्हटले आहे.

जग बदल घालून घाव । सांगून गेले मला भीमराव । गुलामगिरीच्या या चिखलात । रुतून बसला का ऐराव । अंग झाडूनी निघ बाहेरी । घे बिनी वरती घाव ।। हा डॉ.भारतरत्न बाबासाहेब आंबेडकरांचा संदेश आपल्या कवनातून व्यक्त केला. अण्णाभाऊचे हे गीत आजही समाजाला प्रेरणा देणारे, दिशा देणारे आहे. हा संदेश आपल्या हृदयावर कोरला जावा. असा आहे युगानुयुगाचे समज नष्ट होण्यासाठी दलित समाज एकजीव होण्यासाठी त्यांनी दिलेला संदेश आज लाख मोलाचा ठरला आहे. अण्णा भाऊच्या साहित्य विषयी वि.स. खांडेकरांनी म्हटले होते. नदीचा प्रवाह काय तिच्या काठावरच्या लोकांच्या इच्छेनुरूप वाहतो. पण त्यानं कितीही वेडी वाकडे वळण घेतली तरी त्याच्या भोवतालचा भाग तो पिकवीत जातो. कलावंतांचा तसंच आहे. अण्णाभाऊचे लेखन कार्य हे याच प्रकारचे होते. कार्ल मार्क्स यांच्या तत्त्व विचारांचा प्रभाव व डॉ.भारतरत्न बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराचा प्रभाव आणि स्वतःची स्वतंत्र प्रतिभा शक्ती या आविषकारा मधून एक वेगळ्याच रसायनाचे साहित्य त्यांनी निर्माण केले. म्हणूनच या शाहिरांचा आज जयजयकार होत आहे.तो आज आणि उद्याही होत राहील.



प्रा.बरसमवाड विठ्ठल गणपतराव
अध्यक्ष:विठू माऊली प्रतिष्ठान
खैरकावाडी ता. मुखेड जि. नांदेड

माझी मैना गावावर राहिली ।
माझ्या जीवाची होतीया काहीली ।।

हे गीत गाऊन सर्वांच्या डोळ्यात झणझणीत अंजन घातले. तसेच ते मुंबईच्या स्वरूपाविषयी लिहितात.

हे मुंबई बंदर । सगळ्या दुनियेत सुंदर । छानदार हालीच्या वेळी दिवाळी संध्याकाळी । चहुकडून हवा दिसे पिवळी । भारी मजा पिल हौसा जवळी ।। अशा पद्धतीचे वर्णन करून आपल्या शाहिरीला धार दिली आहे. त्यांनी आपल्या आयुष्यात आपला वेळ कधीच वाया घालवला नाही. साहित्य क्षेत्रातील त्यांची उंची अतिशय मोठी आहे. फकीरा ही कादंबरी त्यांनी डॉ.बाबासाहेब यांना अर्पण केली आहे. त्या कादंबरीचे २२ भाषेत भाषांतर झाले आहे. ३५ कादंबऱ्याचे लेखन त्यांनी आपल्या आयुष्यात केले. वेगवेगळ्या नाटिका, पोवाडे गायले, स्मशानातील सोनं ही त्यांच्या जीवनातील अतिशय महत्त्वाची अशी कथा आहे. अण्णाभाऊंनी बेकायदेशीर लोक मंत्री, दे.भ.घोटाळे, दुष्काळात तेरावा, पेंग्याचं लग्न, पुढारी मिळाला, माझी मुंबई, बिलंदर बुडवे अशी विविध वगनाट्य लिहिले. त्याच्यामधून त्यांनी सवाल-जवाब रंगविले. गरिबी व श्रीमंती यांच्यातील कायमची दरी त्यांनी आपल्या वगनाट्यातून सांगून समाजाला दारिद्र्यातून वर आणण्याचा प्रयत्न केला. श्रीमंत लोक हे गोरगरीब, पीडित, लोकांना कशा पद्धतीने लुटतात. याची माहिती त्यांनी वगनाट्यातून करून दिली. माझा रशियाचा प्रवास हे. अनुभवाच्या शाळेतून वास्तववादी लेखन केले आहे. संयुक्त महाराष्ट्राला मोठे यश मिळत असताना लोकशाहीर आण्णाभाऊ साठे, शाहीर अमीर शेख, शाहीर द.ना.गवाणकर या व्यक्तींनी अतिशय आपल्या लेखणीतून मोठ्या प्रमाणात जनजागृती केली. त्यांच्या जोडीला वृत्तपत्रे प्रबोधन, केसरी, सकाळ, नवाकाळ, नवयुग प्रभात यांनी सुद्धा जनजागृतीचे काम केले. अण्णाभाऊच्या साहित्याची दखल आजतागायत व्यवस्थितपणे घेतली गेली नाही. त्यांच्या वाट्याला नेहमी दुःखच आले आहे. दोन दिवस शाळेत गेल्यानंतर त्यांनी शाळा सोडून दिली आणि समाजाची शाळा चालवली. समाजाला प्रेरणा देण्यासाठी या व्यक्तीने आयुष्यभर आपल्या साहित्यातून परिवर्तन केले. आज समाजा मध्ये अनेक एक गट पडत आहेत, जाती निर्माण केल्या जात आहेत.

प्रत्येक जातीच्या हातात वेगळा झेंडा देऊन समाजामध्ये तंटे निर्माण होत आहेत. त्या काळात शाहीर अण्णाभाऊ साठे यांनी सर्व समावेशक असे आपले कार्य केले. म्हणूनच आज आपण स्वतंत्र महाराष्ट्रात राहत आहोत. याची जाणीव आजच्या समाज बांधवांनी घ्यावी. आज त्यांच्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने त्यांच्या या वाङ्मयीन कार्याला मानाचा मुजरा....

# आतुरता गुरु पौर्णिमेची...

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

आपली ज्ञानज्योत शब्दांनी नव्हे, तर प्रत्यक्ष अनुभूतीने प्रज्वलित करावी सद्गुरू हे साक्षात् महादीप आहेत. त्यांच्या प्रज्वलित दीपातून आपल्या अंतःकरणातील दीप प्रज्वलित करावी जसा एखादा मनुष्य हातात प्रज्वलित दिवा घेऊन अंधारलेल्या रस्त्यावरून जातो आणि जो कोणी त्या दिव्यापासून स्वतःचा दिवा पेटवतो, त्याच्या घरात प्रकाश पसरतो; तसेच आहे. परंतु जो जागृत असूनही स्वतःचा दिवा पेटवत नाही, तो जणू अंधारातच राहणे पसंत करतो. आज सद्गुरू स्वतः महादीप बनून या पृथ्वीवरून तुमच्या दाराशी आले आहेत. अजूनही वेळ गेलेली नाही... जागता आलं तर जागा!

बाहेरच्या प्रभातकाळाचा सूर्य उगवला आहे आणि सद्गुरूंचा महादीप तुमच्या दाराशी उभा आहे. आपल्या समजुती, कल्पना आणि अज्ञानाची चादर दूर सारून, आपल्या अंतःकरणातील विझलेला दिवा पुढे करा आणि त्या परमप्रकाशाने स्वतःचे जीवन प्रकाशित करून घ्यावे.

आत्मनिवेदन भक्तीचे (नवविधा भक्तीतील नववी भक्ती) अत्यंत सुंदर आणि अनुभवप्रधान स्वरूप आहे.

याचा गाभा असा आहे की

''मी हा देह, मन, बुद्धी नसून त्या सर्वांचा साक्षी असलेले निराकार चैतन्य आहे; आणि तेच चैतन्य सद्गुरूंच्या कृपेने स्वतःला ओळखते.''

हेच आत्मनिवेदन आहे. येथे भक्त भगवंताला काही अर्पण करत नाही; तर स्वतःचा मीपणाच अर्पण करतो.



|| अध्यात्म ||
अपर्णा परांजपे
पुणे मो. 95030 45495

समर्थ रामदासस्वामी दासबोध (दशक ४, समास ९ आत्मनिवेदन भक्ती) मध्ये म्हणतात ''आत्मनिवेदन म्हणजे आपणपणा सोडणे; मी-तूचा भेद नाहीसा होणे; सर्वस्व परमात्म्यालाच अर्पण करणे.''

भगवद्गीतेतही भगवान श्रीकृष्ण म्हणतात

सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज।
अहं त्वां सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः।।
(गीता १८.६६)

येथील ''शरणं व्रज'' म्हणजे केवळ बाह्य शरणागती नव्हे, तर अहंकाराचे संपूर्ण समर्पणहेच आत्मनिवेदन.

तसेच बृहदारण्यक उपनिषद म्हणते

द्रष्टा श्रोता मन्ता विज्ञाता जो पाहणारा, ऐकणारा, जाणणारा आहे, तोच आत्मा.

''जो पाहतो तोच निराकार आहे.''

हे उपनिषदातील साक्षी-चैतन्याच्या तत्त्वाशी पूर्ण सुसंगत आहे. म्हणून हा लेख केवळ प्रेरणादायी नाही; तो भक्ती, वेदांत आणि सद्गुरूकृपा यांचा अद्वैत संगम आहे. भक्तीचा प्रारंभ नामस्मरणाने होतो, परंतु तिची परिपूर्णता आत्मनिवेदनात होते. तेथे भक्त, भगवंत आणि भक्तीहा त्रिपुटीभेदही लय पावतो. यालाच संत ज्ञानेश्वर माउली म्हणतात ''जे जे भेटे भूत, ते ते मानिजे भगवंत.'' आणि शेवटी अनुभव येतो

''पाहणारा, पाहिले जाणारे आणि पाहणेहे तिन्ही एकाच चैतन्याचे स्वरूप आहे.'' हीच आत्मनिवेदन भक्तीची पराकाष्ठा आहे.

जय जय रघुवीर समर्थ

# आषाढ-निसर्गाचा हिरवा उत्सव (भाग-२)

ज्योतिर्मय साहित्य

थोडक्यात सांगायचे तर, आषाढाचे आगमन हे सृष्टीचे पुनरुज्जीवन करणारे आहे. तो एकाच वेळी शेतकऱ्याच्या डोळ्यात आशेचा किरण, वारकऱ्याच्या मनात भक्तीचा भाव आणि कवीच्या कल्पनेत सौंदर्याची पालवी फुटवणारा महिना आहे. हा ऋतू आपल्याला निसर्गाच्या जवळ जाण्याचा आणि कृतज्ञ राहण्याचा संदेश देतो.

आषाढाचे आगमन: संत आणि विचारवंतांच्या दृष्टीकोनातून एक आत्मिक प्रवास

आषाढाचे आगमन ही केवळ एक ऋतू वैज्ञानिक घटना नाही, तर ती भारतीय, विशेषतः महाराष्ट्रीय जनमानसाच्या आत्मिक आणि बौद्धिक मंथनाची नांदी आहे. या महिन्याकडे जेव्हा आपण संत आणि आधुनिक विचारवंतांच्या नजरेतून पाहतो, तेव्हा त्याचे विलोभनीय रूप समोर येते. आषाढ हा निसर्गाच्या पातळीवर जेवढा भौतिक आहे, तेवढाच संतांच्या पातळीवर तो आध्यात्मिक आणि विचारवंतांच्या पातळीवर सामाजिक क्रांतीचा पाया आहे.

१. संतांची अनुभूती:- विरहाकडून मिलनवेधाकडे

संतांनी आषाढातील काळ्या ढगांना आणि पावसाला भक्तीचे माध्यम बनवले. त्यांच्या मते, उन्हाळ्याने व्याकुळ झालेली धरणी म्हणजे ईश्वराच्या विरहाने तडफडणारा जीव आणि आषाढाचा पाऊस म्हणजे ईश्वरी कृपेचा वर्षाव.

संत तुकाराम महाराज आणि आषाढ:- तुकोबांच्या गाथेत आषाढाचे संदर्भ मानवी मनाच्या आर्ततेशी जोडलेले आहेत. ते म्हणतात,

''आषाढी कार्तिकी विसरू नका मज। सांगतसे गूज विठोबाचे।।''

तुकोबांसाठी आषाढ हा केवळ एक महिना नव्हता, तर तो विठ्ठल भेटीचा काळ होता. जशी चातक पक्षी पावसाची वाट पाहतो, तशीच जीवात्म्याची विठ्ठल माऊलीसाठी झालेली व्याकुळता संतांनी आषाढाच्या रूपात मांडली.

संत ज्ञानेश्वर माउलींची भक्तीची वृष्टी: - माउलींनी ज्ञानेश्वरीत निसर्गाच्या रूपकांचा अप्रतिम वापर केला आहे. आषाढात जेव्हा ढग बरसतात, तेव्हा ज्ञानेश्वर महाराजांना त्यात ज्ञानोबा-तुकाराम या नामाची आणि ब्रह्मांडाच्या अद्वैताची अनुभूती येते. वारीच्या रूपाने लाखो पावले जेव्हा पंढरीकडे निघतात, तेव्हा तो




ज्ञानेश्वरांच्या भूतदया आणि पसायदानातील वैश्विक कल्याणाचा जिवंत सोहळा ठरतो.

२. आधुनिक विचारवंतांचा दृष्टिकोन:- समता आणि समाजशास्त्रीय मंथन

विशेष...
दिलीप देशपांडे.
जामनेर. जिल्हा जळगाव.
८९९९५६६९१७
dilipdeshpande24@gmail.com



आधुनिक विचारवंत आणि समाजशास्त्रज्ञांनी आषाढाच्या आगमनाला आणि वारीला एका वेगळ्या, प्रगत दृष्टीकोनातून पाहिले आहे.

इरावती कर्वे आणि संस्कृतीचा उगम: थोर विचारवंत इरावती कर्वे यांनी वारीचा अभ्यास करताना असे म्हटले आहे की, ''वारी हा महाराष्ट्राचा सांस्कृतिक आणि भावनिक सांधा आहे.'' आषाढात जेव्हा संपूर्ण महाराष्ट्र शेतीची कामे सांभाळून किंवा वारीत सहभागी होऊन एका सूत्रात बांधला जातो, तेव्हा तो समाजातील जात-पात विसरून एकसंध होतो. हा सामाजिक लोकशाहीचा सर्वात मोठा आविष्कार आहे.

डॉ. रामचंद्र देखणे यांचे कृषी आणि भक्तीचे अद्वैत: विचारवंत डॉ. रामचंद्र देखणे यांच्या मते, आषाढ हा कृषी संस्कृती आणि श्रम संस्कृतीचे संमेलन आहे. एका हाताने विठ्ठलाची पताका धरणारा वारकरी दुसऱ्या हाताने शेतात नांगर धरतो. संतांनी कधीही कर्मापासून पळ काढायला शिकवले नाही, तर कांदा, मुळा, भाजी, अवघी विठाई माझी म्हणत श्रमालाच देव मानले.

३. महाकवी कालिदास आणि वैचारिक सौंदर्यशास्त्र

आषाढाचा विचार कालिदासांशिवाय अपूर्ण आहे. आषाढाच्या पहिल्या दिवशी (आषाढस्य प्रथम दिवसे) त्यांनी पाहिलेला मेघ हा केवळ पाऊस पाडणारा ढग नव्हता, तर तो एका मानवी हृदयातील भावना दुसऱ्या हृदयापर्यंत पोहोचवणारा वैचारिक दूत होता. कालिदासांनी निसर्गाचे मानवीकरण केले. त्यांच्या मते, निसर्ग हा जड नसून तो मानवासारखाच सुख-दुःखाच्या संवेदना जाणणारा आहे. हा विचार आजच्या काळात पर्यावरणवादी तत्त्वज्ञान म्हणून ओळखला जातो.

४. आषाढाचे मानसशास्त्रीय आणि वैचारिक फलित

संत आणि विचारवंतांच्या या संदर्भांमधून आषाढ महिन्याचे तीन प्रमुख वैचारिक पैलू समोर येतात:

अहंकाराचा लोप: वारीच्या वाटेवर श्रीमंत-गरीब, उच्च-नीच हा भेद संपतो. संतांच्या भाषेत हा अहंभाव संपवण्याचा काळ आहे.

आशेचे पुनरुज्जीवन: आषाढात पडणारा पाऊस माणसाला नैराश्यातून बाहेर काढून आशेचा किरण दाखवतो. ''पेरते व्हा'' हा निसर्गाचा संदेश मानवी मनाला सतत कार्यमग्न राहण्याची प्रेरणा देतो.

अंतर्मुखता : चातुर्मासाच्या सुरुवातीमुळे हा काळ स्वतःच्या दोषांचे विश्लेषण करण्याचा आणि बौद्धिक प्रगतीचा मानला जातो.

थोडक्यात सांगायचे तर, आषाढाचे आगमन हे संतांसाठी भक्तीचा उत्सव आहे, शेतकऱ्यासाठी कर्माचा यज्ञ आहे आणि विचारवंतांसाठी सामाजिक समतेचे व्यासपीठ आहे. हा महिना आपल्याला हेच शिकवतो की, जीवनात भौतिक समृद्धी (पाऊस आणि पीक) जितकी महत्त्वाची आहे, तितकीच आत्मिक आणि वैचारिक समृद्धी (भक्ती आणि ज्ञान) देखील गरजेची आहे.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559